अनुकंपा अंतर्गत परिचर (गट ड) या पदावर
नियुक्ती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-४/२५/३०६/२०२५
अहिल्यानगर दिनांक /०६/२०२५
01/07/2025

वाचा:- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट १२ (३) (ब)
२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. अकंपा१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक- २१/०९/२०१७
३. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.अकंपा१२२१/प्रक्र१८६/का-८ दिनांक- २६/०८/२०२१
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील अनुकंपा नियुक्तीबाबतचे इतिवृत्त दिनांक- २४/०६/२०२५

**कै. महेश चंद्रकांत भागवत**, हे **कनिष्ठ सहाय्यक**, या पदावर **शिक्षण विभाग(प्राथमिक), जि. प. अहिल्यानगर** येथे जिल्हा परिषदेच्या सेवेत असताना त्यांचे दिनांक **०१/०६/२०२४** रोजी निधन झाल्याने त्यांचे पात्र वारसदार **श्री. ओंकार महेश भागवत** यांनी स्वतः अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज या कार्यालयास सादर केला आहे. त्यानुसार सदर अनुकंपा प्रकरणाची संदर्भीय शासन निर्णयातील निर्देशाच्या अधीन राहून छाननी व पडताळणी केलेली आहे.

**श्री. ओंकार महेश भागवत** हे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा प्रवेश नियम १९६७ मधील परिशिष्ट १२ (३) (ब) मधील तरतुदीनुसार परिचर (गट-ड) या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याने **परिचर (गट-ड)** या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र ठरत आहेत.

त्यानुसार संदर्भीय शासन निर्णयातील निर्देशानुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर संदर्भ क्र. ४ अन्वये मंजुर इतिवृत्तानुसार समउपदेशनाद्वारे **श्री. ओंकार महेश भागवत** यांना पुढे नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून जिल्हा सेवेतील **परिचर (गट-ड)** या सरळसेवेच्या पदावर सुधारित वेतन संरचना **एस-१ वेतनश्रेणी रु. १५०००-४७६००** मध्ये अनुकंपा तत्वावर रकाना क्र. ५ मध्ये नमुद ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात पदस्थापनेने नियुक्ती करत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. ओंकार महेश भागवत | विमाप्र | खुला | पंचायत समिती राहुरी |

नेमणुकीबाबतच्या अटी व शर्ती :-

१. परिचर गट-ड या पदावर केलेली नेमणूक पूर्णत: हंगामी स्वरुपाची असुन कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना व कारण न दाखविता जिल्हा परिषद सेवेतुन कमी करण्याचा हक्क राखुन ठेवलेला आहे, तसेच सदर नेमणुकीमुळे त्यांना यापुढे शासकिय नेमणुकीसाठी कोणताही हक्क प्रस्थापित करता येणार नाही.
२. सदर नियुक्ती आदेश दिनांकापासुन पदस्थापनेच्या ठिकाणी ३० दिवसांचे आत हजर होणे आपणांस बंधनकारक राहिल अन्यथा सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.
३. प्रथम नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासभत्ता अगर इतर कोणत्याही प्रकारची सवलत मिळणार नाही
४. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार नियुक्त्यांसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्यानुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार

उमेदवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखांनी भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दि. २८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य असणा-या उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

५. सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणांस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय,परिपत्रक,अधिसुचना तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशांचे तंतोतंत पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ११ परिशिष्ट ३ मध्ये नमुद केल्यानुसार सदर पदावर रुजू झाल्याचे दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत जिल्हा शल्य चिकित्सक अहिल्यानगर यांचेकडील शारिरीकदृष्टया पात्रतेसंबंधीचे वैद्यकिय प्रमाणपत्र नेमणूकीचे कार्यालयास सादर करावे.

७. सदर नियुक्ती चांगले चारित्र्य व यापूर्वी असणाऱ्या सेवेत कोणत्याही प्रकारचा ठपका असता कामा नये अशा अटींवर करण्यांत आली आहे. यामध्ये एखादी गैरबाब आढळल्यास तुमची सेवा समाप्त करण्यांत येईल.

८. तुम्ही विवाहित असल्यास तुम्हास एकच पती/पत्नी आहे, असे समजण्यांत येईल, एकापेक्षा अधिक पती/पत्नी आढळून आल्यास तुमची सेवा तत्काळ समाप्त करण्यांत येईल.

९. नेमणूक झालेल्या पदावरुन स्थायी झालेनंतर आंतरजिल्हा बदली करावयाची झाल्यांस त्यासाठी शासन निर्णय दि. २९ सप्टेंबर, २०११ मधील तरतुदीच्या व प्रचलित शासन निर्णयाच्या अधिन राहुन तसा अर्ज आपणांस प्रशासनाकडे करता येईल.

१०. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नुसार उमेदवाराने नियुक्ती वेळी खात्रीशीर कागदपत्रे पुराव्यासह जन्म तारीख घोषित करील. जेव्हा नियुक्तांची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्ताऐवज असल्याचे मानन्यात येईल, अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा शाळेत तो/ती शेवटी शिकत होता, अशा मान्यताप्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानन्यात येईल, त्यानुसार उमेदवाराने जन्म तारखेचे परिशिष्ट-५ (अ) मध्ये हमीपत्र देईल. त्यानंतर खंड (ब) मध्ये विर्निदिष्ठ केल्याप्रमाणे शासकीय प्रवेश केल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या कालावधीनतर अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

११. खात्याच्या पूर्व परवानगीशिवाय तुम्हांस कोणतेही प्रशिक्षण अगर शिक्षण घेता येणार नाही.

१२. उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यांत प्रतिज्ञापत्र भरुन ज्या कार्यालयात नेमणूक करण्यांत आली आहे. त्या संबंधीत अधिका-याकडे द्यावी लागेल. मी ------------------------------------------ रा. मु पो -------- ता.--------------- जि. अहिल्यानगर प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, जिल्हा परिषद सेवेत माझी जिल्हा सेवा परिचर (गट-ड) या पदावर झालेली नियुक्ती ही वेतनबॅण्ड (एस-१) रु.१५०००-४७६०० या वेतन श्रेणीत (अधिक प्रचलीत नियमानुसार मिळणार महागाई भत्ता व इतर भत्ते) यामध्ये पूर्णपणे हंगामी स्वरुपाची असून ती कोणतेही कारण अथवा नोटीस न देता संपविण्याचा जिल्हा परिषदेला पूर्ण अधिकार असून त्या अटीवर मी ही नेमणूक स्विकारित आहे.

१३. सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून ३ महिन्याचे आत महाराष्ट्र जि. प. जि. सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम १७ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र वशिअ/-१२१४/प्रक्र-२६/११, दि.०२/०६/२०१४ नुसार विहीत केलेले भत्ता व दायित्व असेटस ॲड लायबीलीटीज या बाबतचे विवरणपत्र भरुन देण्यात यावे.

१४. सदर पदावर रुजू झालेनंतर जर काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीचा राजीनामा दयावयाचा असेल तर यांनी एक महिना अगोदर तशी नोटीस देणे आवश्यक आहे. व नोटीस देणे शक्य नसेल तर नोटीसीपोटी एक महिन्याचे मुळ वेतन शासनाकडे भरावे लागेल. सदरचा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत नेमणुकीचे ठिकाणी हजर व्हावे. मुदतीत हजर न झाल्यास नोकरीची गरज नाही असे गृहीत धरुन नियुक्ती आपोआप रदद झालेचे समजणेत येईल.

१५. महाराष्ट्र शासन साप्रवि कडील शासन निर्णय चरित्र्य-२११७/प्र.क्र. ४८३/२०१७/१६-अ दि. २८/०८/२०१७ मधील सुचनेनुसार सदरची नियुक्ती "चांगले चारित्र असणे" या अटीवर देण्यात येत आहे. सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून ६ महिन्याचे आत चारित्र्य पडताळणी करून सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याची नोंद सेवा पुस्तकामध्ये घेण्यात यावी. यामध्ये एखादी गंभिर बाब केव्हाही निदर्शनास आल्यास सेवा संपुष्ठात आणण्यात येईल.

१६. आपण आपल्या अनुकंपा प्रकरणामध्ये सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व प्रतिज्ञापत्राच्या आधारे व संबंधित गट विकास अधिकारी/विभाग प्रमुखांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या आधारे आपणास सदरची नियुक्ती देण्यात

येत आहे. सदरची कागदपत्रे,माहिती,प्रतिज्ञापत्रे यातील मजकुर खोटे असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा प्रतिज्ञापत्रातील कोणत्याही अटींचा भंग आपल्याकडुन भविष्यात झाल्यांस सदरची नियुक्ती तात्काळ विनानोटीस समाप्त करण्यात येईल व खोटे प्रतिज्ञापत्र करुन दिल्याबाबत संबधीताविरुध्द नियमानुसार कारवाई करणेत येईल.

१७. सदरची नेमणुक ही शासन निर्णय क्रं साप्रवि/अकंपा/१०९३/२३३५/प्रक्र ९०/९३/८ दि. २६/१०/१९९४ चे निर्णयातील तसेच याबाबत वेळोवेळी निर्गत केलेल्या शासन आदेशातील अटीस अधीन राहुन देण्यात येत आहे.

१८. जि. प. सेवेत असतांना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय,धंदा,अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१९. कार्यालय प्रमुखांना खालील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत. (१.) गट विमा योजना (२.) वैद्यकीय दाखला (३.) जातीचा दाखला (४.) जात वैधता प्रमाणपत्र (५.) स्वग्राम घोषणा पत्र (६.)शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र तसेच स्वाक्षांकित जात वैधता प्रमाणपत्र मुळ सेवा पुस्तक भरतांना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी व याबाबत स्वत: खात्री करन घ्यावी.

२०. शासन ग्रामविकास विभाग क्रं अनियो-२०१५/प्र.क्र.-६२/वित्त-५, दि.१३ जून २०१७ राष्ट्रिय निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अशंराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण/जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.

२१. शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रं घभाभ-१००५ /प्र. क्र. ४६३ /पापु १६ दि. ८ जुन २००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असले बाबत व त्याचा वापर करत असलेबाबत स्वयंघोषित प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे. ज्यांच्याकडे शौचालयाची सुविधा नाही अथवा जे उमेदवार शौचालयाचा वापर करीत नाहीत त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात यावा. संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तक भरतांना उपरोक्त मुळ कागदपत्रे डकविण्यात यावी. ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री स्वत: करुन घ्यावी.

२२. महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.रानियो-२०२२/प्रक्र/३४/सेवा-४ दि.३१/३/२०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यांस त्याच्या कुटुंबियांनाकुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्ती वेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा निवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरीता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसांच्या आत विकल्प कार्यालयांस सादर करणे आवश्यक आहे.

२३ सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रं बीसीसी-२०११/प्र.क्रं.१०६४/२०११/१६ब दि.१२ डिसेंबर २०११ अन्वये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली व ज्यांची जात पडताळणी झालेली नाही अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी, नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबधित जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहील. नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरीत रदद करण्यात येईल. अशा उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग/जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

२४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. अकंपा-१०९५/प्र. क्र. ३४-अ/आठ दि. २३/०८/१९९६ व शासन निर्णय दि. २१/०९/२०१७ मधील तरतुदीनुसार गट-क मधील पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यास पदाच्या उपलब्धतेअभावी गट-ड मधील पदावर नियुक्ती दिल्यास पद

उपलब्ध होताच गट-क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती द्यावी असे नमुद आहे. त्यानुसार गट-क मधील पद उपलब्ध होताच आपणास प्राधान्याने नियुक्ती देण्यात येईल.

तरी सदर आदेशाची नोंदी संबंधीत कर्मचा-यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी. तसेच उपरोक्त अटी व शर्तींची देखील काटेकोर पालन व पुर्तता करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्र. 20250701040121 असा आहे.

आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. ओंकार महेश भागवत
मु. पो. ३७ अ, महेश सदन, सिद्धी विनायक कॉलनी, सावेडी
ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर - ४१४००३

प्रत:- १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.), जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत: गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी
२/- सदर उमेदवार हजर होताच हजर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- निवड नस्ती

आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर